# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

क्रमांक : कार्या-3क/मा.अ./कावि- 2609/15
दिनांक : 22/1/2016

प्रति,
श्री.अनिल वेदव्यास गलगली
2, जुना खारवाला चाळ,
काजुपाडा, साकीनाका,
मुंबई-400 072.

**विषय:-** माहितीचा अधिकार अधिनियम 2005

**संदर्भ:-** आपला दि.31/12/2015 चा अर्ज.

**महोदय,**

विषयांकित प्रकरणी आपला संदर्भिय अर्ज पहावा. सदर अर्जान्वये आपण संबंधित नस्तीचे दि.16/1/2016 रोजी प्रत्यक्ष निरीक्षण केलेले आहे. निरीक्षण अंती आपण अवगत करून दिलेप्रमाणे कागदपत्रे उपलब्ध करून देणे शक्य आहे. सदरची कागदपत्रे प्राप्त करणेकामी प्रथम रू.196/-(रूपये एकशे शहाण्णव मात्र) इकडील कार्यालयात सकाळी 11 ते 3 या वेळेत भरणा करावेत. तद्नंतर सदर कागदपत्रे आपणांस उपलब्ध करून दिली जातील याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू

**शासकीय माहिती अधिकारी,**
**तथा अवल कारकून (कार्या 3 क)**
**मुंबई उपनगर जिल्हा**

**प्रत:** लेखा शाखा यांचेकडे माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.



Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, 10 वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई-400 051
दूरध्वनी : 26556799, फॅक्स : 26556805, ई -मेल : collectormsd@gmail.com

क्रमांक : 02/141अ/3क/एफ 170
दिनांक : 15/1/2016

प्रति,
मा.श्रीम.हेमा मालिनी
लोकसभा सदस्य,
(नाटयविहार कला केंद्र),
17, जयहिंद सोसायटी, 12 वा रस्ता,
जुहू विलेपार्ले स्किम, मुंबई-400 009.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत
देण्यात येणाऱ्या छायांकित प्रत

**विषय:-** जमिन मुंबई उपनगर जिल्हा
नाटयविहार कला केंद्र या सामाजिक संस्थेला
मौजे आंबिवली ता.अंधेरी येथील स.क्र.109अ/1
तत्सम न.भू.क्र. 3/अ या शासकीय मिळकतीपैकी 2000.00चौ.मी.चा
भूखंड प्रदान करणेबाबत.

**संदर्भ:-**क्र.2693/2129/प्र.क्र.-4674/पुनर्बांधणी/252/ज-3. दि.05/03/2015.

महोदया,

विषयांकित प्रकरणी शासन महसूल व वन विभाग यांचेकडील संदर्भिय ज्ञापन प्राप्त झाले असून सदर ज्ञापनान्वये मौजे आंबिवली, तालुका अंधेरी येथील सर्व्हे नं.109 अ/1, न.भू.क्र.3पै, 2000.00 चौ.मी. जमीन या संस्थेस शासन निर्णय दि.8/2/1983 तसेच शासन निर्णय दि.11/5/1984 मधील परिच्छेद 1(2) मध्ये दिलेल्या सुधारित तरतुदीनुसार सांस्कृतिक संकुल (शास्त्रीय संगीत, कला, नृत्य इ.) या प्रयोजनासाठी सदर जमिनीच्या दि.1/2/1976 रोजीच्या मुल्यांकनाच्या 25% इतकी कब्जेहक्काची रक्कम आकारून नाटयविहार कला केंद्र चॅरीटी ट्रस्ट यांना काही अटी/शर्ती वर मंजूर केलेली आहे. तरी सदर ज्ञापनातील अटी/शर्तीचे अनुषंगाने आपणांस कळविणेत येते की प्रकरणी खालीलप्रमाणे कागदपत्रे / मुद्दयाची पूर्तता करावी.

1) संस्थेकडे सांस्कृतिक संकुल प्रकल्पाच्या नियोजित खर्चाच्या 25% रक्कम सध्या उपलब्ध नसल्याचे स्पष्ट होत आहे. यास्तव संस्थेकडे प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या 25% एवढी रक्कम उपलब्ध असलेबाबतचे वित्तीय संस्थेचे प्रमाणपत्र संस्थेने 2 महिन्यांच्या आत इकडील कार्यालयात सादर करावेत.

2) संस्था प्रकल्प खर्चाची उर्वरित 75% रक्कम पूर्ण करण्याचे दृष्टीने कशाप्रकारे उपलब्ध करणार आहे याचा ठोस पुरावा संस्थेने या कार्यालयास सादर करावा.



Scanned by CamScanner

3) संस्थेस यापुर्वी मौजे वर्सोवा, तालुका अंधेरी सर्व्हे नं.61 लगतच्या खाडी जमिनीच्या अभिन्यास क्र.1 मधील 1741.89 चौ.मी. क्षेत्राचा आगाऊ ताबा संस्थेस दि.4/4/1997 रोजी देण्यात आलेला आहे. तरी सदर जमिनीचा ताबा संस्थेने तात्काळ तहसिलदार, अंधेरी / नगर भूमापन अधिकारी, अंधेरी यांचेकडे द्यावा.

4) संस्थेस प्रदान केलेल्या भूखंडाचे क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रावर सार्वजानिक प्रयोजनासाठी बगीचाचा विकास संस्थेमार्फत स्वखर्चाने करणेत येईल याबाबतचे रू.200/- च्या मुद्रांक कागदावर संस्थेने हमीपत्र सादर करावे.

तरी संस्थेस प्रदान करावयाच्या भूखंडाचे दि.1/2/1976 चे मुल्यांकन सहायक संचालक, नगर रचना मुंबई शहर यांचेकडून मागविणेत येत आहे. सदरचे मुल्यांकन प्राप्त झाल्यानंतर प्राप्त होणाऱ्या मुल्यांकनाप्रमाणे संस्थेने कब्जेहक्काची रक्कम शासन भरणा केल्यानंतर व संस्थेने वर नमूद केलेल्या 1 ते 4 मुद्यांची पूर्तता केल्यानंतर जमीन प्रदानाबाबत अंतिम आदेश या कार्यालयाकडून निर्गमित करणेत येतील याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर करीता

स्थळप्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची सही असे

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत
देण्यात येणाऱ्या छायांकित प्रत

20/01/16

Rahul Sharma
P.A to Hema Malini
20/1/16

Scanned by CamScanner

३२५

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

---

क्रमांक : ०२/१४१अ/३क/एफ-१७०
दिनांक : ०५/११/२०१२

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव (महसूल)
महसूल व वन विभाग, मंत्रालय,
३२ वा मजला, सेंटर-१ इमारत
जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड
मुंबई-४००००५

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत
देण्यात येणाऱ्या साक्षांकित प्रत

**विषय:-** **<u>जमिन मुंबई उपनगर जिल्हा</u>**
**मौजे आंबिवली, तालुका अंधेरी येथील सर्वे न.१०१अ/१, पैकी तत्सम न.भू.क्र. ३ पैकी गार्डनसाठी आरक्षित असलेल्या शासकीय मिळकतीपैकी २००० चौ.मी. जागा नाट्यविहार कला केंद्र या सामाजिक संस्थेला देणेबाबत**

**संदर्भ :** क्र. जमीन २६१२/सं.क्र.व्हीआयपी-९३/ज-३.दि.५/१०/२०१२

**महोदय,**

विषयांकित प्रकरणी आपलेकडील संदर्भाधिन पत्राचे कृपया अवलोकन होणेस विनंती आहे. प्रस्तुत पत्राच्या अनुषंगाने सादर करण्यांत येते कि, प्रकरणी इकडील कार्यालयाचे सम क्रमांकाचे दि.३०/०८/२००७ च्या पत्रान्वये सविस्तर अहवाल शासनाकडे सादर करण्यांत आलेला आहे. सदर अहवालात नमुद करण्यांत आले होते कि, विषयांकित जागा संबंधितांना प्रदान करणेपुर्वी जागेवर असलेले उद्यानाचे आरक्षण बदलावे लागेल व तद्नंतर सदरची जागा प्रदान करता येईल. परंतु दरम्यानच्या काळात प्रश्नांकित मिळकतीबाबत शासन, नगर विकास विभाग यांनी अधिसूचना क्र.टीपीबी-४३०७ /प्र.क्र.३०४/ २००७/नवि-११, दि.३०/०७/२०१० निर्गमित केलेली असून सदर अधिसूचनेचे मध्ये नमुद करण्यांत आले आहे कि, मौजे आंबिवली, तालुका अंधेरी येथील सर्वे क्र.१०१ओ/१, न.भू.क्र.३ (पै) क्षेत्र २९३६०.५० चौ.मी.क्षेत्र हे गार्डन साठी व १८.०० चौ.मी. क्षेत्र डो.पी. रोडसाठी आरक्षित ठेवण्यांत आलेले होते. परंतु अर्जदार श्रीमती हेमा मालिनी यांनी त्यांचे दि.६/०७/२००७ च्या अर्जान्वये शासनास विनंती केलेली होती कि, उपरोक्त मिळकतीपैकी आरक्षित क्षेत्र २००० चौ.मी. जागा मे.नाट्यविहार कला केंद्र चॅरीटी ट्रस्ट करिता प्रदान करण्यांत यावी व उर्वरित जागेवर नियोजित गार्डनचा विकास त्यांचे ट्रस्टमार्फत करण्यांत येईल. सदरचा प्रस्ताव शासन, नगर विकास विभाग यांनी अधिसूचना क्र. TPB

---

जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर यांचे कार्यालय, प्रशासकिय इमारत १० वा मजला,शासकिय वसाहत,वांद्रा (पूर्व)मुंबई ५१
कार्यालय ११-२६५५६७११/२६५५१८०७ फॅक्स २६५५६८०५ इमेल collectormumbaisuburban@mah.gov.in
E:\3C\KAVI-natyavihar.doc

Scanned by CamScanner

4307/1366/CR/304/2007/UD-11 दि.३०/०७/२०१० अन्वये मान्य केला आहे. सदर अधिसूचनेद्वारे गार्डनसाठी आरक्षित असलेल्या क्षेत्रापैकी २००० चौ.मी. क्षेत्र नाट्यविहार कला केंद्र यासाठी आरक्षित ठेवून उर्वरित क्षेत्रावर ट्रस्टने स्वखर्चाने गार्डनचा विकास करावा, अशी अट घातलेली आहे. तरी उपरोक्त अधिसूचनेच्या अनुषंगाने तथा शासनाचे प्रचलित धोरणानुसार प्रश्नांकित जागा उक्त संस्थेस प्रदान करणेबाबत शासन स्तरावर योग्य तो निर्णय होणेस विनंती आहे. तत्पुर्वी उपरोक्त संस्थेस मंजूर केलेला भूखंड रद्द करण्यांत येवून त्याचा ताबा शासनाकडे घेणे आवश्यक आहे. प्रस्तुत नस्तीची पुर्नबांधणी करुन सोबत सादर केली आहे.(पाने १ ते ३००)

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात येणाऱ्या साक्षांकित प्रत

आपला विश्वासू

स्थळप्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही असे

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरिता

प्रत :- मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

07/11/12
Issued

# तहसिलदार अंधेरी

Adivitya Bunglow No. 17, Road No. 12, Jai Hind Society, JVPD Scheme
Juhu, Mumbai - 400 049

डी.एन. रोड. अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०५८. (०२२-२६२३१३६८)

क्र. तह/अंधेरी/जमिन/१०८५/२०१५.
दिनांक ०१/०७/२०१५.

प्रति.
मा. जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा.

WS-582
02/07/15

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
दिनांक
01 JUL 2015
15984
कार्यासन
मुद्रांकित लिपिक

विषय :- <u>जमिन मुंबई उपनगर जिल्हा</u>
नाट्यविहार कला केंद्र या सामाजिक संस्थेला मौजे. आंबिवली ता.अंधेरी येथील स.क्र.१०९अ/१ तत्सम नभूक्र. ३(पै) गार्डनसाठी आरक्षित असलेल्या शासकीय मिळकतीपैकी २००० चौ.मी. जमिन मंजूर करणेबाबत.

संदर्भ :- आपलेकडील पत्र क्र.०२/१४१अ/३क/एफ१७०.दि.१७/०३/२०१५ रोजीचे पत्र.

प्रसतुत प्रकरणी शासनाचे दि.०५/०३/२०१५ चे पत्रातील मुद्यांनुसार खालील प्रमाणे अहवाल सादर करणेत येत आहे.

१) नाट्यविहार कला केंद्र ही संस्था धर्मदाय संस्था म्हणून दि. ०७/०८/१९८३ रोजी नोंदणीकृत असलेबाबत संस्थेने नोंदणीचे प्रमाणपत्राची प्रत सादर केली आहे.

२) प्रकल्पाची एकूण किंमत रु.१८,४८,९४,५००/- एवढी असल्याबाबत संस्थेने वास्तुविशारदाचे पत्राची प्रत सादर केली असून संस्थेकडे रु०३,५०,००,०००/- निधी उपलब्ध असल्याचे जबाबात नमुद केले आहे. सदरचा निधी प्रकल्प किंमतीच्या २५% पेक्षाकमी असून सदर निधी उपलब्ध असलेबाबत वितीय संस्थेचा दाखला/प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

३) उर्वरीत निधी बँकेमार्फत उभारणार असल्याचे जबाबात नमुद आहे. परंतु कोणत्या प्रकारे उभारणार याचे ठोस पुरावे दिलेले नाहीत.

४) आरक्षणाबाबत कागदपत्र अर्जदार यांनी सादर केलेले नाहीत तथापी मंडळ अधिकारी यांनी केलेल्या स्थळपाहणी नुसार भूखंड सीआरझेड बाधीत नाही.

प्रकरणी पुढील आदेश होणेस विनंती आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत
देण्यात येणाऱ्या छायांकित प्रत

तहसिलदार अंधेरी

D:\Desk 3\Collector office letters/2014-15 New File - 478

Scanned by CamScanner

(51)

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

क्रमांक : ०२/१४१३/इक/एफ १७०
दिनांक : २९/०९/२०१५

प्रति,
मा. प्रधान सचिव
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय:- जमिन मुंबई उपनगर जिल्हा
नाटयविहार कला केंद्र या सामाजिक संस्थेला
मौजे आंबिवली ता.अंधेरी येथील स.क्र.१०९अ/१
तत्सम नभूक्र. ३/अ गार्डनसाठी आरक्षित असलेल्या
शासकीय मिळकतीपैकी २००० चौ.मी.जमीन मंजूर
करणेबाबत

संदर्भ:-क्र.२६९३/२१२९/प्र.क्र.-४६७४/पुनर्बांधणी/२५२/ज-३.
दि.०५/०३/२०१५

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत
देण्यात येणाऱ्या छायांकित प्रत

विषयांकीत प्रकरणी आपलेकडील संदर्भिय पत्राचे कृपया अवलोकन होणेस विनंती आहे. सदरहू पत्रात नमूद केलेल्या मुद्दयाचे अनुषंगाने तहसिलदार, अंधेरी यांचेमार्फत आवश्यक ती कागदपत्रे संबंधित संस्थेकडून प्राप्त करून घेतलेली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) नाटयविहार कला केंद्र ही संस्था धर्मादाय संस्था म्हणून दि.०७/०८/१९८३ रोजी नोंदणीकृत असल्याबाबत संस्थेने त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

२) प्रकल्पाची एकूण किंमत रू.१८,४८,९४,५००/- एवढी असल्याबाबत संस्थेने वास्तुविशारद यांचेकडील पत्राची प्रत सादर केलेली आहे.

३) तसेच संस्थेचे प्रतिनिधी यांनी त्यांच्या जबाबात नमूद केले आहे की, संस्थेकडे सद्यस्थितीत रू.३,५०,००,०००/- एवढा निधी उपलब्ध आहे. सदरचा निधी प्रकल्प किंमतीच्या २५% पेक्षा कमी असून सदर निधी उपलब्ध असलेबाबत वित्तीय संस्थेचा दाखला/प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर यांचे कार्यालय, प्रशासकिय इमारत १० वा मजला,शासकिय वसाहत,बांद्रा (पूर्व)मुंबई ५१
कार्यालय ९१-२६५५६७९९/२६५५७८०७ फॅक्स २६५५६८०५ इमेल collectormumbaisuburban@mah.gov.in

Scanned by CamScanner

४) उर्वरित निधी बँकेमार्फत उभारणार असल्याचे जबाबात नमूद आहे. परंतु जमीन तारण ठेऊन निधी उभारणार आहे किंवा कसे याबाबत ठोस पुरावे दिलेले नाहीत.

५) प्रश्नांकित भूखंडाचे आरक्षणाबाबतची कागदपत्रे अर्जदार यांनी सादर केलेली नाहीत. तथापि, मंडळ अधिकारी यांनी केलेल्या स्थळपाहणीनुसार प्रस्तुत भूखंड सीआरझेड बाधित नाही.

तसेच प्रश्नांकित मिळकतीची दि. १४/८/२०१५ रोजी निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, मा.श्रीम. हेमामालिनी, खासदार, श्री. प्रमोद जठार विधानसभा सदस्य,तहसिलदार अंधेरी यांचे कार्यालयातील श्री.विशाल इंदुलकर (ना.त.), कार्यकारी अभियंता (विकास आराखडा) बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील प्रतिनिधी श्री.कावरे,दुय्यम अभियंता, नगर भूमापन अधिकारी, अंधेरी यांचेकडील श्री. तेली ,परिरक्षण भूमापक उपस्थित होते.

स्थळ पाहणीच्या वेळी श्री. कावरे, दुय्यम अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी शासन, नगर विकास विभाग यांचेकडील **दि. ३०/७/२०१०** च्या अधिसुचने सोबतचे मंजूर आराखडयानुसार नाटयविहार कला केंद्रासाठी आरक्षित ठेवण्यात आलेल्या **२००० चौ.मी.** क्षेत्राच्या हद्दी/सिमांकन दाखविलेले होते त्याप्रमाणे संबंधित परिरक्षण भूमापक यांनी मोजणी करुन स्थळदर्शक नकाशा आवश्यक त्या टिपासह इकडिल कार्यालयास सादर केलेला असून त्याची प्रत सांबत जोडली आहे.

जिल्हा वार्षिक योजना **सन -२०१४-२०१५** अंतर्गत परिसर सुंदर बनविण्याचा कार्यक्रम **(सौदर्यीकरण)** अंतर्गत प्रश्नांकित मिळकती मध्ये **पेव्हर्स ब्लॉक बसविणे/लाल माती टाकणे व इत्यादी** कामे करण्यासाठी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तथा जिल्हा नियोजन समिती मार्फत **दि. १/८/२०१४** रोजी प्रशासकीय मंजुरी आदेश निर्गमित केलेले आहेत.सदर मंजुरी आदेशाप्रमाणे प्रश्नांकित मिळकतीवर पेव्हर्स ब्लॉक बसविण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे प्रश्नांकित मिळकतीवर श्रीम. भारती लवेकर, विधानसभा सदस्य यांचे कार्यालय, शौचालय व वॉचमेनसाठी बांधण्यात आलेले झोपडे अशी एकूण ३ बांधकामे असल्याचे स्थळ पाहणीच्या वेळी आढळून आलेले आहे.

तसेच उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) अंधेरी यांनी **दि. १५/२/२०१४** च्या अहवालात नमुद केले आहे की, मौजे आंबिवली ता. अंधेरी येथील **सर्वे क्र. १०९अ/१ ,न.भू.क्र. ३/अ** या शासकीय मिळकतीवर एकुण ५ अतिक्रमणे होती. उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) अंधेरी यांनी त्याचे अहवालात नमुद केलेली अतिक्रमणे ही उपरोक्त संस्थेस प्रदान करण्यात येणाऱ्या नगर भूमापन क्रमांकाच्या अन्य क्षेत्रावर झालेली आहेत.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत
देण्यात येणाऱ्या छायांकित प्रत



Scanned by CamScanner

(512)

उपरोक्त अतिक्रमणे ही शासन ,नगर विकास विभाग यांचेकडील दि. ३०/७/२०१० च्या अधिसुचने नुसार नाटयविहार कला केंद्रासाठी आरक्षित करण्यात आलेल्या क्षेत्रावर झालेली नाहीत असे स्थळ पाहणी अंती आढळून आलेले आहे. यास्तव प्रश्नांकित मिळकत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नाटयकलाविहार संस्थेस शासन ,नगर विकास विभाग यांचेकडील दि. ३०/७/२०१० च्या अधिसूचनेत नमूद केलेल्या अटी/शर्तीवर प्रदान करणेस हरकत नाही.तरी याबाबत शासन स्तरावर पुढील आदेश निर्गमित होणेस विनंती आहे.सोबत ७/१२ उतारे, मिळकतपत्रिका, स्थळदर्शक नकाशा संस्थेने सादर केलेले कागदपत्रे इत्यादी जोडली आहेत.

**सोबत पाने १ते**

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत
देण्यात येणाऱ्या छायांकित प्रत

Scanned by CamScanner

मा.प्रधान सचिव, (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, यांचे अध्यक्षतेखाली दि.19/11/2015 रोजी दुपारी 4.00 वाजता आयोजित केलेल्या बैठकीसाठी सविस्तर टिपणी

विषय:- जमिन मुंबई उपनगर जिल्हा
नाट्यविहार कला केंद्र या सामाजिक संस्थेला
मौजे आंबिवली ता.अंधेरी येथील स.क्र.109अ/1
तत्सम नभूक्र. 3/अ गार्डनसाठी आरक्षित असलेल्या
शासकीय मिळकतीपैकी 2000 चौ.मी.जमीन मंजूर
करणेबाबत

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात येणाऱ्या प्राधाकित प्रत

शासन हेतुपत्र क्र.जमीन-2689/39903/प्र.क्र.2149/ज-3, दि.18/1/1996 अन्वये मौजे वर्सोवा, तालुका अंधेरी येथील सर्व्हे नं.161 लगतच्या खाडी जमिनीचा अभिन्यास क्र.1 मधील भूखंड क्र.7 क्षेत्र 1295.32 चौ.मी. अधिक विकास रस्त्याचे मोबदल्यात 446.57 चौ.मी चटई क्षेत्र निर्देशांक मिळून एकूण 1741.89 चौ.मी. चा भूखंड मे. नाट्यविहार कलाकेंद्र चॅरीटी ट्रस्ट यांना शास्त्रीय संगीत, कला, नृत्य इ. संकल्पित प्रयोजनासाठी मंजूर करण्यास शासनाने तत्वत: मान्यता दिलेली होती. शासन पत्र दि.3/1/1997 मधील निर्देशानुसार सदर भूखंडाचा आगाऊ ताबा दि.4/4/1997 रोजी संस्थेच्या विश्वस्तांना देण्यात आलेला होता. प्रस्तुत भूखंडाचे अनुषंगाने संस्थेने कब्जेहक्काने रकमेपोटी रू.दहा लक्ष एवढी रक्कम दि.2/1/2002 रोजी शासनास अदा केलेली आहे. संस्थेस मंजूर केलेल्या भूखंडापैकी काही भाग सीआरझेडने बाधित झाल्यामुळे संस्थेस प्रस्तुत भूखंडावर बांधकाम करता आलेले नाही.

तद्नंतर नाट्यविहार कला केंद्र चॅरीटी ट्रस्ट च्या विश्वस्त श्रीम. हेमा मालिनी यांनी वरील मिळकती ऐवजी मौजे आंबिवली, तालुका अंधेरी येथील सर्व्हे क्र.109 अ/1 न.भू.क्र.3 (पै) गार्डन साठी आरक्षित असलेल्या शासकीय मिळकतीपैकी 5000.00 चौ.मी. क्षेत्र प्रदान करणेबाबत मा.मंत्री, (महसूल) महसूल व वन विभाग यांचेकडे दि.23/7/2007 च्या पत्रान्वये विनंती केलेली होती. उपरोक्त संस्थेने मागणी केलेली जागा गार्डनसाठी आरक्षित असून सदर जागेवर बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दि.2/12/1998 च्या पत्रान्वये अभिन्यास मंजूर केलेला होता. सदर अभिन्यासामध्ये गार्डनसाठी 29360.50 चौ.मी. क्षेत्र दर्शविलेले होते. त्यापैकी 5000.00 चौ.मी क्षेत्राचो नाट्यविहार कला केंद्र चॅरीटी ट्रस्ट यांनी मागणी केलेली होती. मागणी केलेली जागा प्रदान करण्यापुर्वी जागेवर असलेले आरक्षण बदलावे लागेल व तद्नंतर सदरची जागा संबंधित संस्थेस प्रदान करता येईल असे अभिप्राय नोंदवून प्रकरणी शासन स्तरावर निर्णय होणेबाबत शासनास या कार्यालयाचे दि.30/7/2007 च्या पत्रान्वये अहवाल सादर करण्यात आलेला होता.

दरम्यानच्या काळात प्रश्नांकित मिळकतीबाबत शासन, नगर विकास विभाग यांनी अधिसूचना क्र.टीपीबी-4307 /प्र.क्र.304/ 2007/नवि-11, दि.30/07/2010 निर्गमित केलेली असून सदर अधिसूचनेचे मध्ये नमुद करण्यांत आले आहे कि, मौजे आंबिवली, तालुका अंधेरी येथील सर्वे क्र.109अे/1, न.भू.क्र.3 (पै) क्षेत्र 29360.50 चौ.मी.क्षेत्र हे गार्डन साठी व 18.00 चौ.मी. क्षेत्र डी.पी. रोडसाठी आरक्षित ठेवण्यात आलेले होते. परंतु

Scanned by CamScanner

अर्जदार श्रीमती हेमा मालिनी यांनी त्यांचे दि.6/07/2007 च्या अर्जान्वये शासनास विनंती केलेली होती कि, उपरोक्त मिळकतीपैकी आरक्षित क्षेत्र 2000 चौ.मी. जागा मे.नाटयविहार कला केंद्र चॅरीटी ट्रस्ट करिता प्रदान करण्यांत यावी व उर्वरित जागेवर नियोजित गार्डनचा विकास त्यांचे ट्रस्टमार्फत करण्यांत येईल. सदरचा प्रस्ताव शासन, नगर विकास विभाग यांनी अधिसूचना क्र. TPB 4307/1366/CR/304/2007/UD-11 दि.30/07/2010 अन्वये मान्य केला आहे. सदर अधिसूचनेद्वारे गार्डनसाठी आरक्षित असलेल्या क्षेत्रापैकी 2000 चौ.मी. क्षेत्र नाटयविहार कला केंद्र यासाठी आरक्षित दाखवून उर्वरित क्षेत्रावर ट्रस्टने स्वखर्चाने गार्डनचा विकास करावा, अशी अट घातलेली आहे.

तरी उपरोक्त अधिसूचनेच्या अनुषंगाने तथा शासनाचे प्रचलित धोरणानुसार प्रश्नांकित जागा उक्त संस्थेस प्रदान करणेबाबत शासन स्तरावर योग्य तो निर्णय होणेबाबत शासनास या कार्यालयाचे दि.7/11/2012 च्या पत्रान्वये अहवाल सादर करण्यात आलेला आहे. सदर अहवालाचे अनुषंगाने शासनाने उपरोक्त संस्थेसंबंधी काही मुद्दयांबाबत माहिती मागविलेली होती. त्याअनुषंगाने शासनास या कार्यालयाचे दि.29/9/2015 च्या पत्रान्वये अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

शासनास दि.29/9/2015 रोजी अहवाल सादर करणेपुर्वी प्रश्नांकित मिळकतीची दि. 14/8/2015 रोजी स्थळपाहणी करण्यात आली. सदर स्थळपाहणीच्या वेळी निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, मा.श्रीम. हेमामालिनी, खासदार, श्री. प्रमोद जठार, माजी विधानसभा सदस्य, तहसिलदार अंधेरी, नगर भूमापन अधिकारी, अंधेरी यांचे कार्यालयातील प्रतिनिधी व बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील प्रतिनिधी उपस्थित होते.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात येणाऱ्या छायांकित प्रत

स्थळ पाहणीच्या वेळी श्री. कावरे, दुय्यम अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी शासन, नगर विकास विभाग यांचेकडील दि.30/7/2010 च्या अधिसुचने सोबतचे मंजूर आराखडयानुसार नाटयविहार कला केंद्रासाठी आरक्षित ठेवण्यात आलेल्या 2000 चौ.मी. क्षेत्राच्या हद्दी/सिमांकन दाखविलले होते त्याप्रमाणे संबंधित परिरक्षण भूमापक यांनी मोजणी करुन स्थळदर्शक नकाशा आवश्यक त्या टिपासह इकडिल कार्यालयास सादर केलेला होता.

जिल्हा वार्षिक योजना सन 2014-2015 अंतर्गत परिसर सुंदर बनविण्याचा कार्यक्रम (सौदर्यीकरण) अंतर्गत प्रश्नांकित मिळकती मध्ये पेव्हर्स ब्लॉक बसविणे/लाल माती टाकणे व इत्यादी कामे करण्यासाठी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तथा जिल्हा नियोजन समिती मार्फत दि.1/8/2014 रोजी प्रशासकीय मंजुरी आदेश निर्गमित केलेले आहेत. सदर मंजुरी आदेशाप्रमाणे प्रश्नांकित मिळकतीवर पेव्हर्स ब्लॉक बसविण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे प्रश्नांकित मिळकतीवर डॉ. भारती लव्हेकर, विधानसभा सदस्य यांचे कार्यालय, वॉचमेनसाठी बांधण्यात आलेले झोपडे व शौचालय अशी एकुण 3 बांधकामे असल्याचे स्थळ पाहणीच्या वेळी आढळून आलेले आहे.

तसेच उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) अंधेरी यांनी दि.15/2/2014 च्या अहवालात नमुद केलेले होते की, मौजे आंबिवली ता. अंधेरी येथील सर्वे क्र. 109अ/1 ,न.भू.क्र. 3/अ या शासकीय मिळकतीवर एकुण 5

Scanned by CamScanner

अतिक्रमणे होती. उपरोक्त अतिक्रमणे ही शासन, नगर विकास विभाग यांचेकडील दि.30/7/2010 च्या अधिसुचने नुसार नाटयविहार कला केंद्रासाठी आरक्षित करण्यात आलेल्या क्षेत्रावर झालेली नाहीत असे स्थळ पाहणी अंती आढळून आलेले आहे. यास्तव प्रश्नांकित मिळकत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नाटयकलाविहार संस्थेस शासन, नगर विकास विभाग यांचेकडील दि.30/7/2010 च्या अधिसूचनेत नमूद केलेल्या अटी/शर्तीवर प्रदान करणेस हरकत नाही असा अहवाल शासनास या कार्यालयामार्फत दि.29/9/2015 रोजी सादर करण्यात आलेला असून सदर प्रकरण सद्यस्थितीत शासन स्तरावर प्रलंबित आहे.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत
देण्यात येणाऱ्या छायांकित प्रत

## महाराष्ट्र शासन

क्रमांक : जमीन-२६१३/२१२९/प्र.क्र.४६४७/पुनर्बांधणी-२५२/ज-३,
महसूल व वन विभाग,
शिबिर कार्यालय, हैद्राबाद हाऊस,
सिव्हील लाइन्स, नागपूर.
दिनांक :- २३ डिसेंबर, २०१५

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत
देण्यात येणाऱ्या छायांकित प्रत

31 DEC 2015
31749

विषय :- नाट्यविहार कला केंद्र चॅरिटी ट्रस्ट या संस्थेला मौ.आंबिवली, ता. अंधेरी येथील स.क्र. १०९अ/१, न.भू.क्र. ३ (पै) २००० चौ.मी. जमीन पर्यायी स्वरुपात मंजूर करणेबाबत.

ज्ञापन:- जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना त्यांचे पत्र क्र. ०२/ १४१/अ/ ३ क/ एफ-१७० दिनांक ३०.७.२००७ व पत्र क्र. ०२/ १४२अ/ ३ क, एफ १७०, दिनांक २९.९.२०१५ ला अनुलक्षून असे कळविण्यात येते की, नाटयविहार कला केंद्र चॅरिटी ट्रस्ट या संस्थेस शासन पत्र क्र.जमीन-२६१३/२१२९/प्र.क्र.४६४७/ पुनर्बांधणी-२५२/ज-३, दि. १८.१२.१९९६ अन्वये मौ. वर्सोवा येथील स.नं. १६१ लगतच्या जमिनीच्या अभिन्यास क्र. १ मधील सुमारे १७४१.८९ चौ.मी. क्षेत्राचा ( उपलब्ध चटईक्षेत्र निर्देशांकासह ) भूखंड क्रमांक ७ सांस्कृतिक संकुल (शास्त्रीय संगीत, कला, नृत्य इ.) प्रयोजनासाठी मंजूर करण्याबाबतचे दिलेले हेतूपत्र याद्वारे रद्द करुन त्याऐवजी, मौजे आंबिवली, ता.अंधेरी येथील सर्वे क्र.१०९ अ/१, न.भू.क्र.३ पैकी २००० चौ.मी. जमीन नाटय विहार कला केंद्र चॅरिटी ट्रस्ट या संस्थेस, शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एलआरएफ-१०८३/ ७११३४/ प्र.क्र.३४७८/ग-६, दिनांक ८.२.१९८३ तसेच शासन निर्णय क्र.एलआरएफ-१०८२/१४९६/ सीआर-३७००/ ग-६, दिनांक ११ मे, १९८४ मधील परिच्छेद १(२) मध्ये दिलेल्या सुधारित तरतुदीनुसार सांस्कृतिक संकुल (शास्त्रीय संगीत, कला, नृत्य इ.) या प्रयोजनासाठी सदर जमिनीच्या दिनांक ६.२.१९७६ रोजीच्या मूल्यांकनाच्या २५ टक्के इतकी कब्जेहक्काची रक्कम आकारुन खालीलअटी व शर्तीवर मंजूर करण्यात येत आहे:-

**अटी व शर्ती :-**

(१) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दिनांक २९.९.२०१५ रोजीच्या वर उल्लेखिलेल्या पत्रानुसार वाटपधारी संस्थेकडे सांस्कृतिक संकुल प्रकल्पाच्या नियोजित खर्चाच्या २५ % रक्कम सध्या उपलब्ध नसल्याचे स्पष्ट होते. सबब, सदर संस्थेने त्यांचा सविस्तर प्रकल्प अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करावा व या प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या २५ % एवढी रक्कम संस्थेकडे उपलब्ध असल्याबाबतचे वित्तीय संस्थेचे प्रमाणपत्र संस्थेने दोन महिन्याच्या आत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे सादर करावे. सदर संस्थेकडे प्रकल्प खर्चाच्या २५ % एवढी रक्कम उपलब्ध असल्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी त्यांच्या स्तरावर खात्री करावी.

Scanned by CamScanner

(२) सदर संस्था प्रकल्प खर्चाची उर्वरित ७५ % रक्कम प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने कशा प्रकारे उपलब्ध करणार आहे, याचा ठोस पुरावा संस्थेने सादर करणे आवश्यक राहील. सदर पुराव्याच्या आधारे संस्था प्रकल्प खर्चाची उर्वरित ७५ % रक्कम उपलब्ध करु शकेल, याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी त्यांच्या स्तरावर खात्री करावी व त्यानंतरच जमीन वाटपाचे आदेश काढावेत.

(३) सदर संस्थेस यापुर्वी मौजे वर्सोवा स.न.१६१ लगतच्या खाडी जमीनीच्या अभिन्यास क्र.१ मधील १७४९.८९ चौ.मी. क्षेत्राचा (उपलब्ध चटईक्षेत्र निर्देशांकासह) आगावू ताबा दि.०४.०४.१९९७ रोजी देण्यात आलेला आहे. या ज्ञापनानुसार पर्यायी जमिनीचा सदर संस्थेस ताबा देण्यापुर्वी वर नमुद आगावू ताबा दिलेली जमीन प्रथम शासनाच्या ताब्यात घेण्याची जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दक्षता घ्यावी.

(४) सदर संस्थेला यापुर्वी मौ. वर्सोवा, ता. अंधेरी येथील स.नं. १६१ लगतचा अभिन्यास क्र. १ मधील सुमारे १७४९.८९ चौ.मी. क्षेत्राचा ( उपलब्ध चटईक्षेत्र निर्देशांकासह) एक भूखंड क्र. ७ मंजूर करण्याचे हेतूपत्र देण्यात आले होते व संस्थेला दिनांक ४.४.१९९७ रोजी आगाऊ ताबा देण्यात आला होता. सदर संस्थेने जमिनीच्या कब्जेहक्काच्या रकमेपोटी रु.१०,००,०००/- रकमेचा भरणा दिनांक २.१.२००२ रोजीच्या धनादेशाद्वारे शासनास केला होता. सदर संस्थेला वरीलप्रमाणे पर्यायी क्षेत्र मंजूर झाल्यानंतर त्या अनुषंगाने या ज्ञापनातंर्गत जमिनीच्या होणाऱ्या मूल्यांकनापोटी जी रक्कम संस्थेकडून शासनास देय होईल, ती निश्चित करताना, संस्थेने यापुर्वी भरलेल्या रु.१० लाख रकमेचे समायोजन करण्यात यावे व उर्वरित रक्कम सदर संस्थेकडून वसूल करुन घेण्यात यावी.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत
देण्यात येणाऱ्या छायांकित प्रत

(५) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी त्यांच्या दिनांक २९.९.२०१५ रोजीच्या वर उल्लेखिलेल्या पत्रामध्ये सदर जमिनीवर ३ बांधकामे असल्याचे नमूद केले आहे. त्या बांधकामांना जिल्हाधिकारी / नियोजन प्राधिकरण / शासनाची मान्यता नसल्यास या ज्ञापनानुसार जमिनीचा ताबा सदर संस्थेस देताना, ती बांधकामे निष्कासित करुन जमीनीचा ताबा देण्याची खबरदारी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी घ्यावी.

(६) वाटपधारी संस्थेने आवश्यक असलेल्या अटी व शर्तींची पूर्तता केल्यानंतरच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी जमीन मंजुरीविषयीचे आदेश विहित अटी व शर्तीवर निर्गमित करावेत.

(७) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एलआरएफ-१०८३/ ७११३४/ प्र.क्र.३४७८/ग-६, दिनांक ८.२.१९८३ व शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एलआरएफ-१०८३/१४९६/ प्र.क्र. ३७००/ग-६, दिनांक ११ मे १९८४ मधील अटी व शर्ती वाटपधारी संस्थेवर बंधनकारक राहतील.

(८) सदर संस्थेस या ज्ञापनानुसार जमीन अंतिमरित्या मंजूर झाल्यानंतर नगरविकास विभागाच्या अधिसूचना क्र. टीपीई-४३०७/१३६६/सीआर-३०४/२००७/नवि-११, दिनांक ३०.७.२०१० नुसार अधिूचनेनुसार मौजे आंबिवली, ता. अंधेरी येथील स.क्र. १०९ ओ/१, न.भू.क्र. ३ (पै) क्षेत्र २९३६०.५० चौ.मी. या बगीचासाठी आरक्षित ठेवलेल्या क्षेत्रापैकी सदर संस्थेस प्रदान करावयाचे २००० चौ.मी. क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रावर संस्थेने स्वखर्चाने सार्वजनिक प्रयोजनासाठी बगिचाचा विकास करणे बंधनकारक राहील. तसे हमीपत्र २०० रुपयांच्या मुद्रांक कागदावर सदर

Scanned by CamScanner

संस्थेने सादर करणे अनिवार्य राहील. बगीचाचा विकास करताना जमिनीचे सपाटीकरण करणे, जमिनीला कंपाऊंड घालणे, बगिचामध्ये हिरवळ तयार करणे, बगीचामध्ये सामान्य नागरीकांना चालण्यासाठी अंतर्गत रस्ते तयार करणे, नागरीकांना बसण्यासाठी आसने तयार करणे यानुषंगाने किमान विकास करणे बंधनकारक राहील. मात्र, याव्यतिरिक्त बगीचाचा चांगल्या प्रकारे विकास व सुशोभिकरण करण्याचा संस्थेचा मानस असल्यास, संस्थेस स्वेच्छेने सदर बगीचा आणखी चांगल्या प्रकारे विकसित करुन बगीचामध्ये सुशोभिकरण करता येईल.

(९) बृहन्मुंबई महानगरपालिका ही बगीचाच्या आरक्षणाखालील जमिनीबाबत समुचित प्राधिकरण असल्याने वाटपधारी संस्थेने बगीचाचा विकास केल्यानंतर सदर जमीन बगिचासह जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत आदेश पारीत करावेत.

(१०) बगीचासह जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाल्यानंतर सदर जमिनीवरील बगीचाची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेची राहील.

(११) बगीचासाठी आरक्षित जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाल्यानंतर सदर जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेला फक्त बगीचासाठीच वापरता येईल. भविष्यात सदर जमिनीवरील आरक्षण बदलून इतर प्रयोजनासाठी वापर करावयाचे असल्यास शासनाच्या महसूल व वन विभागाची पूर्वमान्यता घ्यावी लागेल.

(१२) वाटपधारी संस्थेस ज्या प्रयोजनासाठी जमीन मंजूर करण्यात येईल, त्याच प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

(१३) वाटपधारी संस्था धर्मादाय स्वरुपाची असून संस्थेस जमीन सवलतीच्या दराने मंजूर करण्यात येत असल्यामुळे या जमिनीपासून संस्थेस कोणत्याही प्रकारचा नफा कमावता येणार नाही.

(१४) या ज्ञापनान्वये मंजूर केलेल्या जमिनीचा विकास संस्थेस स्वत: करावा लागेल. "बांधा, वापरा, हस्तांतर करा (B.O.T.)" किंवा अन्य सार्वजनिक खाजगी सहभागतत्वावर सदर जनीनीचा विकास करता येणार नाही.

(१५) सदर जमिनीचा ताबा घेतल्यापासून दोन वर्षाच्या आत बांधकाम पूर्ण करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

(१६) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना योग्य वाटतील अशा इतर अटी व शर्ती विहीत करण्याची मुभा राहील.

सदर ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने ( अनौ. संदर्भ क्र.४९४/२०१५/व्यय-९, दिनांक ७.१२.२०१५ ) अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात येणाऱ्या छायांकित प्रत

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(माधव काळे)
शासनाचे उप सचिव

प्रति

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, १० वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

Scanned by CamScanner

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

जा.क्र. ससंनर/मूल्यां/उपनगर/आंबिवली-अंधेरी/२४९

जुने जकात गृह, डी.डी.इमारत,
१ ला मजला, शहीद भगतसिंग मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ०२३
दिनांक - 23 /१०/२००८

प्रति,

मा.जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
मुंबई.

विषय : स.क्र.१०१अ, न.भु.क्र.३अ, या शासकीय जागेच्या
रेखांकनातील २८२१ चौ.मी. जागेचे मूल्यांकन.

संदर्भ : आपले पत्र क्र.सी/कार्या-३क/कावि-३८९,दि.३/१०/०८.

महोदय,

स.क्र.१०१अ, न.भु.क्र.३ अ या मौजे आंबिवली, ता.अंधेरी या शासकीय जागेच्या अभिन्यासातील म्युनिसिपल प्रायमरी स्कूल या भूखंडाच्या मूल्यांकनाचा प्रस्ताव संदर्भाधिन पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

या जागेचे पक्षकारासह दिनांक १३/१०/२००८ रोजी स्थळनिरीक्षण केले आहे. या जागेच्या परिसरात मूल्यांकन दिनांकाच्या ५ वर्ष अगोदरचे खरेदी-विक्री व्यवहार व त्या आसपास अंतिम केलेली पूर्व मूल्यांकने यांची छाननी करुन या जागेचे दिनांक १/२/१९७६ हे मूल्यांकन रुपये १४०/- प्र.चौ.मी. या दराने अंतिम करण्यांत येत आहे.

जि. नि. का. मुंबई
उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
दिनांक :- 23 OCT 2008
आ. क्र. :- 25693
सं. क्र. :-
निवासी | नि. उ. जि. | जिल्हाधिकारी

आपला,

सहायक संचालक, नगर रचना,
मुंबई शहर भूमापन व भूमि अभिलेख,मुंबई
व भूमि संपादन विशेष अधिकारी (१)
मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा.

प्रत : मा.उपसंचालक, बृहन्मुंबई यांना माहितीकरीता मूल्यांकन अहवालाच्या प्रतिसह सादर.

Scanned by CamScanner